**निशाणी क्र. २४६ खालील आदेश.**
**(पारीत दिनांक १८ /०९/२०२३)**

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३६ तर्फे त्याच्या लेखी जबाबात दुरुस्ती होवून मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादी क्र. ३६ यांनी असे कथन केले आहे की, त्यांनी दाव्यात त्यांची कैफीयत दाखल केलेली आहे. सदर कैफियतमध्ये त्यांनी सातबारापत्रकी त्यांची नोंद फेरफार क्र. १३९७४ अनुसार झाल्याचे नमूद केलेले आहे. परंतु, फेरफार क्र. १३९७४ हा नजरचुकीने टंकलिखीत झालेला असून, त्याऐवजी १३७३१ नुसार नोंद झालेली आहे. सदर दुरुस्तीमुळे कैफीयतीमध्ये कोणताही परीणामकारक बदल होत नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

**३.** प्रस्तुत अर्जावर वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले असून अर्जातील कथने खोटी व लबाडीची असल्यामुळे, अर्ज नामंजूर होण्यास पात्र असल्याचे कथन केलेले आहे. प्रतिवादी यांनी निशाणी २३७ अन्वये त्यांची कैफियत दाखल केली त्यावेळेस त्यांना सर्व कागदपत्रांची माहिती होती. प्रस्तुतचा अर्ज हा कामकाज लांबविण्याच्या दृष्टीने दिलेला असून तो खारीज

करावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. ३६ यांनी त्यांचा लेखी जबाब निशाणी २३७ अन्वये दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे म्हणण्यानुसार सातबारापत्रकी त्यांची नोंद फेरफार क्र. १३७३१ नुसार झालेली आहे. परंतु, नजरचुकीने त्यांच्या कैफीयतीमध्ये परीच्छेद क्र. ६-ब मध्ये त्यांनी फेरफार क्र. १३९७४ नमूद केलेला आहे. त्यामुळे, फेरफार क्र. "'१३९७४" च्या ऐवजी फेरफार क्र. "१३७३१" नमूद करण्याची परवानगी त्यांनी मागितलेली आहे. वादीतर्फे जरी सदर अर्जाला आक्षेप घेण्यात आला असला तरी सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून त्यामुळे कैफियतमध्ये घेतलेल्या बचावामध्ये कोणताही फरक पडत नाही. दावा प्रलंबित असताना वाद मिळकतीसंबधी अनेक व्यवहार झाले असल्याचे व त्याप्रमाणे अनेक प्रतिवादी दाव्यात सामील झालेले आहेत. जरी दावा हा फार जुना असला तरी अजून नवीन सामील झालेले प्रतिवादींची कैफीयत यायची आहे व त्या अनुषंगाने जादाचे मुद्दे काढणे बाकी आहे. त्यामुळे, प्रतिवादीने प्रकरण लांबविण्याच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज दिला असे म्हणता येणार नाही. प्रस्तुतची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून सदरची दुरुस्ती ही न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३६ ला निर्देशीत करण्यात येते की, आदेशापासून चौदा दिवसाच्या आत त्यांनी त्यांच्या कैफीयत निशाणी २३७ मध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्ती प्रत न्यायालयात दाखल करावी.

MANGESH N JAISWAL Digitally signed by MANGESH N JAISWAL Date: 2023.09.21 13:30:37 +0530

इस्लामपूर (एम. एन. जयस्वाल)

दिनांक १८ /०९/२०२३ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर

इस्लामपूर, जि. सांगली.

**-:CERTIFICATE:-**

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Sunil M. Patil, Stenographer Grade-3 |
| Court Name | :- | Shri. M. N. Jaiswal,<br>2nd Jt. Civil Judge, Jr. Dn., Islampur. |
| Date of decision | :- | 18/09/2023 |
| Date of typing | :- | 18/09/2023 |
| Order signed by PO. on | :- | 18/09/2023 |
| Order uploaded on | :- | 18/09/2023 |